महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७१ वा | दिनांक : २५/०८/२०२५ | वार : सोमवार

## उद्धव ठाकरेंनी मृतांच्या टाळूवरचे लोणी खायचे काम केले : गिरीश महाजन



**चाळीसगाव :** मंत्री गिरीश महाजन यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. उद्धव ठाकरेंनी बडबड करण्यापेक्षा लोकांमध्ये जाऊन बोलावले, कार्यकर्त्यांना कामाला लावावे. याला त्याला बोगस म्हणण्यापेक्षा तुमचे काय? तुम्हाला लोकांनी अडीच वर्ष दिले होते. खरेतर लोकांनी तुम्हाला दिले नाही, तुम्ही दगाबाजी करून ते घेतल्याची टीका महाजन यांनी केली आहे.

गिरीश महाजन म्हणाले, अडीच वर्षांमध्ये तुम्ही काय दिवे लावले तुम्ही घराच्या खाली उतरले नाही. डेड बॉडीमध्ये तुम्ही किती पैसे खाल्ले किती लोक त्यामध्ये जेलमध्ये आहेत. कोरोना काळात मराठी माणसासाठी तुम्ही काय केले? मृतांच्या टाळूवरचे लोणी खाण्याचे काम उद्धव ठाकरेंनी केल्याचा गंभीर आरोप महाजन यांनी केला आहे.

मराठा समाजाला न्याय देण्याचे काम सर्वात पहिले देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. असे असताना कोणीही काहीही बोलावे, आपण कोणाबद्दल बोलतोय याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे, असे गिरीश महाजन म्हणाले. तसेच इतक्या वर्षापासून आपल्या आरक्षणाची मागणी असताना कुठल्याही सरकारने आपल्या पदरात काही टाकलं नाही. ते फक्त देवेंद्र फडणवीस होते ज्यांनी आरक्षणाबाबत वाचा फोडली आणि आमच्या समाजाच्या पदरात काहीतरी दिले. दुर्दैवाने कोर्टात ते टिकले नाही हा भाग वेगळा आहे. आणि दुर्दैवाने आमचे सरकार बदलले त्यामुळे ते कोर्टात तत्कालीन कॉंग्रेसचे सरकार टिकवू शकले नाही, त्यात आमचा दोष नाही.

मनोज जरांगे यांच्यावर प्रतिक्रिया देताना गिरीश महाजन म्हणाले, फडणवीस हे खुणशी आहेत असे म्हणण्याला काही अर्थ नाही, या वक्तव्याला कोणीही साथ देणार नाही असे महाजन म्हणाले. जरांगे पाटील काय बोलत आहेत हे आपण अनेक दिवसापासून ऐकत आहोत. जरांगे पाटील कुठल्या थराला जाऊन बोलत आहेत. आपल्या मागण्या आहेत त्या असू द्या रास्त मार्गाने मागितल्या पाहिजे. कोणाविषयी काही बोलावं मागच्या वेळी त्यांचा बोलण्याचा स्तर इतका खाली गेला होता की लोकांनाही कंटाळा आला होता. आपल्या जिभेवर संयम ठेवला पाहिजे, असा सल्ला महाजनांनी दिला आहे.

## कोण काय खाते याकडे लक्ष देण्याची गरज नाही : छगन भुजबळ



**नाशिक :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मांसाहारावर केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर महायुतीच्या नेत्यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे. मात्र, याच मुद्द्यावर अजित पवार गटाचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी थेट प्रतिक्रिया देण्याऐवजी तो विषय एका वाक्यात संपवला. 'कोण काय खातं याकडे लक्ष देऊ नका,' असे भुजबळ म्हणालेत. तसेच त्यांनी लाडकी बहीण योजनेतील बोगस लाभार्थींवरही भाष्य केले.

येवला येथे पत्रकारांशी बोलताना छगन भुजबळ यांना सुप्रिया सुळे यांच्या 'मी मांसाहार केलेला माझ्या पांडुरंगाला चालतो' या वक्तव्याबद्दल विचारले असता, त्यांनी कुणी काय खावे याकडे जास्त लक्ष देण्याची गरज नाही, असे सांगत हा विषय बाजूला सारला.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेत मोठ्या प्रमाणात बोगस लाभार्थी आढळल्याचे समोर आले आहे. यापैकी सर्वाधिक लाभार्थी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या जिल्ह्यांमध्ये आहेत. यावर बोलताना भुजबळ म्हणाले की, निवडणुका तोंडावर असल्याने अर्ज भरण्याची प्रक्रिया घाईत झाली. सर्व आमदार, मंत्री आपापल्या निवडणुकीच्या कामात व्यस्त होते. त्यावेळेस कोणी काय नोंदवले हे पाहायला वेळ नव्हता. कारण की ठराविक वेळेत ते सुरू करायचे होते. त्यामुळे काही ठिकाणी नियमांचे पालन झाले नाही, पण निवडणूक झाल्यावर त्याची चौकशी करायची असे ठरले होते.

त्यांनी असेही म्हटले की, ज्या महिलांनी चुकीचा लाभ घेतला आहे, त्यांनी स्वतःहून तो सोडून द्यावा, पण ज्या पुरुषांनी महिलांच्या नावाने अर्ज भरून लाभ घेतला आहे, त्यांच्यावर मात्र कारवाई झालीच पाहिजे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'एक कोटी भगिनींना लखपती दीदी बनवणार' या वक्तव्यावर भुजबळ म्हणाले की, 'ही चांगली गोष्ट आहे. आम्हाला बहिणींचे प्रेमही हवे आहे आणि भावांचेही. शेतकऱ्यांसाठी (भावांसाठी) कर्जमाफी, पाणी, वीज, चांगले बाजारभाव यांसारख्या गोष्टींवर सरकार काम करत आहे,' असे सांगत त्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

## एखादा नेता येऊन भेटल्याने युती ठरत नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासोबतच्या युतीच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. "एखादा नेता मला भेटला म्हणून राजकारण ठरत नाही," असे स्पष्ट करत फडणवीस यांनी राज ठाकरे हे महायुतीसोबत येणार नसल्याचे संकेत दिले आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रितपणेच लढणार असल्याचे त्यांनी म्हटले.

काही दिवसांपूर्वीच बेस्टच्या पतपेढी निवडणुकीत ठाकरे बंधूंच्या पॅनलचा दारुण पराभव झाल्यानंतर राज ठाकरे यांनी 'वर्षा' बंगल्यावर जाऊन मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली होती. जवळपास पाऊण तास झालेल्या या भेटीनंतर राजकीय वर्तुळात महायुतीसोबत मनसेची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र महायुती अभेद्य आहे आणि आम्ही निवडणुका एकत्रच लढणार आहोत, असे फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितल्याने त्या चर्चाही संपुष्टात आल्या आहेत. लोकांनी भ्रमित होण्याचे कारण नाही. आम्हाला कोण येऊन भेटतो यावरुन युती ठरत नाही किंवा त्यावरुन राजकारणही होत नसते. आगामी स्थानिक निवडणुका महायुती एकत्र लढणार आणि या निवडणुका महायुतीच जिंकणार आहे, असे फडणवीस म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ ऑगस्ट २०२५


## माळीवाडा लक्ष्मी माता यात्रे मध्ये दोन गटात मारहाण दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल

**दौलताबाद (जावेद अहेमत) :** माळीवाडा लक्ष्मी माता यात्रे मध्ये दोन गटात मारहाण दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल दि.२३ शनिवारी संध्याकाळी ६.३० वाजेदरम्यान छत्रपती संभाजी नगर नाशिक मार्गावर माळीवाडा बस स्टँडवर बिकानेर स्विट समोर दोन गटातील १५ ते २० जनामध्ये जुन्या भांडणाच्या कारणावरुन वाद झाला शिवीगाळ करीत मारझोड करण्यात आली दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये ३० ते ४० व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शनिवारी माळीवाडा येथे लक्ष्मी माता यात्रा होती येथे मोठा जमाव जमला होता. संध्याकाळी ६.२० वाजेच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर नाशिक रोडवर डाव्या बाजुला बापू नाईक, गोविंद नाईक हे त्यांच्या १५ ते २० साथीदारांसोबत तर त्यांच्या समोरच्या बाजुला करण बनकर, आकाश वाघ हे त्यांच्या १५ ते २० साथीदारासह जमा होउन एकमेकांना जोर जोरात शिवीगाळ करत दोन्ही बाजुचे लोक एकत्र येवून एकमेकांना चापटा बुक्याने मारहाण केली सार्वजनिक ठिकाणी जमाव जमवुन जोरजोरात शिवीगाळ करीत आपआपसात मारमारी करुन सार्वजनिक शांतता भंग केली व समाजात दहशत निर्माण केली. रात्री उशिरापर्यंत पोलिसांनी गावात रूट मार्च केले होते.

या प्रकरणी दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये पोलीस अंमलदार महेश घुगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही गटातील ३० ते ४० व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करणे आला असून पुढील तपास पोलिस अंमलदार व्ही एस खंडागळे हे करीत आहे.






## रुसत नाही मी

आता..
आयुष्याच्या उन्हाळयात
अनवाणी पावलांच्या भाळी आलीय
जीवघेणी होरपळ
तरी रुसत नाही मी सावलीवर..

कारण सावलीच्या झाडांनी घेतलाय
निरोप कधीचाच अनंताच्या प्रवासाला
जातांना..

अन् तेव्हा पासून सुरू झाला उन्हाळा
आणि रुसलाय पावसाळा
रानातल्या हिरवाईवर कायमचाच..

तरी ही मी गातो आहे
गाणं हिरवाईचं.. पावसाचं..
अख्ख्या उन्हाळयाला पिऊन
जगण्यासाठी
अन् बाप होऊन लेकरांच्या
सावलीसाठी..


**कवी : ज्ञानेश्वर गायके कन्नड**
**मो. ९४०३३८४८८९**


## मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळेत ग्रीन डे साजरा







**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, मुकुंदवाडी येथे दफ्तर मुक्त शनिवार उपक्रमांतर्गत “ग्रीन डे” उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात शिक्षक व विद्यार्थ्यांनी हिरव्या रंगाचे महत्त्व तसेच फळे व भाज्यांचे पौष्टिक मूल्य याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आकर्षक गीत व कविता सादर करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरेख संचालन श्रीमती सय्यद लुबना यांनी केले. उपक्रमाचे संपूर्ण आयोजन व मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

विशेष म्हणजे या दिवशी विद्यार्थी व शिक्षकांनी हिरव्या रंगाचे ड्रेस व साड्या परिधान करून हरित दिवसाचे औचित्य साधले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ ऑगस्ट २०२५


# 'त्या' ७८ महाविद्यालयांच्या अनुदान प्रश्नी शासनाच्या 'नाझी' प्रवृत्तीच्या धोरणास सुप्रीम कोर्टाने हस्तक्षेप करण्याची मागणी



**सोलापूर** : २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या वरिष्ठ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्याच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने गेले २३ वर्षांपासून भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था पूर्णपणे उध्वस्त करण्याचे जे कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारलेले आहे. त्या धोरणामध्ये हस्तक्षेप करून जी पारंपारिक महाविद्यालये या कायम विनाअनुदानित धोरणात बसत नाहीत. अशा महाराष्ट्रातील ७८ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाला सुप्रीम कोर्टाने शिफारस करावी. यासंदर्भातील माहिती महाराष्ट्र राज्य कृती समिती (एम.) चे उपाध्यक्ष प्रा. डॉ. रामदास नाईकनवरे यांनी दिली.

दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी समितीने सुप्रीम कोर्टाला दिलेल्या निवेदनामध्ये (Inward No. ४४५०४/SCI/ PIL/२०२५ सुप्रीम कोर्ट आ. रजि नं.) म्हटले आहे की, सदरची ही ७८ पारंपारिक महाविद्यालये ही २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीची नियमितपणे सुरू असणारी महाविद्यालये आहेत. परंतु, शासनाच्या नजरचुकीने पूर्वलक्षी प्रभावाने या महाविद्यालयांना कायम विनाअनुदानित धोरणामध्ये अडकविले गेले. यासंदर्भात गेली २३ वर्षापासून समितीच्या माध्यमातून व इतर आंदोलनांच्या माध्यमातून शासनाला वेळोवेळी कल्पना देऊन या महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्याची मागणी झाली.

त्यामुळे शासनाने समितीच्या या भूमिकेचे समर्थन करून या महाविद्यालयांचे तीन वेळा शासकीय समितींच्या वतीने मूल्यमापन करून या महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्यासंदर्भात आश्वासनेही दिली. परंतु, ही केवळ आश्वासनेच राहिली. वर्तमान महाराष्ट्र शासनाच्या काळातही सदर समितीने मुंबईच्या आझाद मैदानावर सलग साडेसात महिने धरणे आंदोलनही केले. परंतु आश्वासना पलीकडे मंत्र्यांनी काहीच दिले नाही.

सुप्रीम कोर्टाला दिलेल्या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या या शोषक नाझीवादी प्रवृत्तीच्या धोरणास गेली 23 वर्षांपासून या वरिष्ठ महाविद्यालयामध्ये काम करणारे हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बळी ठरत आहेत. शासनाचा एकही रुपया पगार न घेता गेली 23 वर्षांपासून काम करणाऱ्या अनेक शिक्षकांनी आर्थिक उध्वस्तलेपणातून आत्महत्याही केल्या आहेत.

आजही काही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. येणाऱ्या काही एक-दोन वर्षामध्ये ते सेवानिवृत्त होत आहेत. उच्चशिक्षणाला उध्वस्त करण्याबरोबरच भारतीय सामाजिक परिस्थितीचे अध:पतन करणाऱ्या शासनाच्या या कुटील धोरणा विरोधात महाराष्ट्र राज्य कृती समितीच्या वतीने अध्यक्ष प्राचार्य, डॉ. बी.डी. मुंडे, सचिव प्राचार्य, डॉ. मुरुडकर आणि राज्य संघटक प्राचार्य, डॉ. गजानन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वेळा शासनातील उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, अर्थमंत्री व मुख्यमंत्री यांच्याकडे अर्ज, विनंती, आंदोलने, आमरण उपोषणे, व धरणे आंदोलने करूनही अद्याप शासनाने अनुदानाचा निर्णय घेतलेला नाही.

शासनाचे हे धोरण शिक्षक व कर्मचारी यांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे. अत्यंत संघर्षशील परिस्थितीतून उच्च शिक्षण घेणे, शिक्षक पात्रतेसाठी युजीसीच्या नियमाप्रमाणे अत्यंत संघर्ष करून पात्रता पूर्ण करणे, आणि शेवटी शिक्षक झाल्यानंतरही त्यांच्या कामाचा मोबदला मिळविण्यासाठी पुन्हा आयुष्यभरही त्यांनी संघर्षच करणे.

ही गोष्ट सामाजिक स्वास्थ व प्रगती बिघडवणारीच आहे. शासनाच्या या समाज विघातक धोरणामुळे सदरच्या ७८ महाविद्यालयांमधील काम करणारी हजारो शिक्षकांची कुटुंबे उध्वस्त झालेली आहेत. व सध्या ती होतही आहेत. गेली २३ वर्षांपासून त्यांचे आर्थिक व सामाजिक शोषण होत असल्यामुळे अनेक मानसिक, कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक समस्यांना त्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सामोरे जावे लागत आहे. गेली २३ वर्षांपासून ही ७८ महाविद्यालये नियमितपणे सुरू असून समाजाच्या व देशाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासामध्ये या महाविद्यालयांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

या महाविद्यालयामधून गेली २३ वर्षांपासून शासनाचा एकही रुपया पगार न घेता काम करणारे अनेक शिक्षक त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व संशोधनात्मक कार्याशी संबंधित आहेत. सदरच्या या महाविद्यालयांना अनुदान देण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने तीन वेळा शासकीय समितींकडून मूल्यमापनही करून घेतलेले आहे. त्याचा अहवाल महाराष्ट्र शासनाकडे आजही पडून आहे. याशिवाय या ७८ महाविद्यालयातील अनेक महाविद्यालयांनी न्याक (NAAC) करून घेवून आपली गुणवत्ताही सिद्ध केलेली आहे. असे असतानाही महाराष्ट्र शासन या महाविद्यालयांच्या संदर्भात जाणीवपूर्वक अनुदानाचा निर्णय घेत नाही. अर्थ खात्याकडून या निर्णयाची सातत्याने गळचेपी करून आर्थिक मंजुरी नाकारली जात आहे.

त्यामुळे, महाराष्ट्र शासनाच्या या तकलादू भूमिकेमुळेच गेले तेवीस वर्षांमध्ये शिक्षकांच्या दोन ते तीन पिढ्या बरबाद होऊन उच्च शिक्षणाचे खूप मोठे नुकसान होत आहे.

यासाठी भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान सरन्यायाधीश आदरणीय, न्यायमूर्ती भूषण गवई साहेब यांनी महाराष्ट्र शासनाच्या 'नाझीवादी' भूमिकेमध्ये हस्तक्षेप करून २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या वरिष्ठ ७८ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्यासंदर्भात कृपया शिफारस करावी. व गेली तीन दशकांपासून शोषित व पीडित असणाऱ्या या महाविद्यालयातील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना न्याय मिळवून द्यावा. अशी विनंती महाराष्ट्र राज्य कृती समिती (एम) च्या वतीने करण्यात आली असल्याचे उपाध्यक्ष प्रा.डॉ. रामदास नाईकनवरे यांनी म्हटले आहे.

## पश्चिम महाराष्ट्र राज्य सहकारी बोर्डवर डॉ. प्रताप पाटील यांचे वर्चस्व कायम तर श्रीरामपूरचे डॉ. गणी पटेल संचालक पदी



डॉ. गणी पटेल



डॉ. प्रताप पाटील

**श्रीरामपूर** - पश्चिम महाराष्ट्र राज्य सहकारी बोर्डच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत वर्तमान अध्यक्ष डॉ प्रताप पाटील यांचे दुसऱ्यांदा वर्चस्व प्रस्थापित झाले. तसेच लाडगाव तालुका ( श्रीरामपूर) येथील डॉ गणी पटेल यांची दुसऱ्यांदा संचालक पदी दिवड झाली.या बोर्डाच्या कार्यक्षेत्रात पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ व खानदेश आदी प्रदेशातील एकूण 14 जिल्ह्यांचा समावेश होतो.नुकत्याच झालेल्या निवडणुकीत प्रताप पाटील यांचे पूर्ण उमेदवार बिनविरोध निवडून आलेत.

ते पुढील प्रमाणे :डॉ प्रताप पाटील,सोलेपाटील जयमाला, सातकर , खैरे सुरेश, डॉ देशमुख वसंतराव, सोनवणे समीर , साठे मानसिंगराव, हुल्यालकर नागोंडा , यादव पाटील, जयदत्त पाटील, शरद थोरात, पाटील मोहनराव, आडमुठे संदीप पाटील, प्रा डॉ गणी पटेल, पाटील सुवर्णा, करांडे पुष्पमाला, रणभिसे अमित, गुरव शरद , राजपूत उदयसिंग उपनिबंधक सहकारी संस्था तथा निवडणूक अधिकारी श्री मिलिंद टाकसाळे यांनी हे निवडणुकीचे परिणाम नुकतेच घोषित केले.डॉ गणी पटेल हे अशोक कारखान्याचे माजी संचालक शेख लाल पटेल यांचे ते कनिष्ठ बंधू असून श्रीरामपूर येथील पटेल क्लिनिकचे डॉक्टर रियाज पटेल यांचे ते काका आहे.डॉ गणी पटेल यांची निवड झाल्याबद्दल लाडगाव सोसायटीचे चेअरमन दत्ता भांड पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक अच्युत राव भांड पाटील, माजी सरपंच संदीप चोरगे पाटील, बाबासाहेब भांड पाटील, दिलीप भांड पाटील, सरपंच आजम पटेल, सोसायटीचे व्हाईस चेअरमन जमशेद पटेल, संपत भांड पाटील, भाऊसाहेब क्षीरसागर, राधा किशन भांड पाटील, हमीद पटेल, शेख खुदा बक्ष, शेख मुन्ना अब्बास, गोरक्षनाथ बडाख पाटील, सोपान भांड पाटील, विष्णू भांड पाटील, मच्छिंद्र थोरे पाटील ज्ञानेश्वर थोरे पाटील, विठ्ठल पवार आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ ऑगस्ट २०२५

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व शहीद नरेंद्र दाभोळकर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .

सदरील स्पर्धेत वक्तृत्व व निबंध लेखनासाठी शिक्षणाचे बदलते स्वरूप: नवीन शैक्षणिक धोरण 2020, अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक दृष्टिकोन, अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आणि कर्तृत्व, नरेंद्र दाभोळकर कार्य आणि कर्तृत्व, उच्च शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असा पाच विषय देण्यात आला होते.

स्पर्धेत अशित संदाशिव पहिला तर अनुष्का खरात ही दुसरी तर निखिल तायडे याने तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळविले, अमोल मगरे यास उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेच्या पूर्वी आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.नवनाथ गोरे यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. व्ही. जी. पिंगळे यांनी नरेंद्र दाभोळकर यांचे कार्य व वैज्ञानिक दृष्टिकोन यावर भाष्य केले, तर डॉ. आर. व्ही. मस्के यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन व कार्याचा परिचय करून दिला.

यावेळी डॉ. वनमाला लोखंडे यांनी समाजातील विविध अंधश्रद्धा व त्यावर अंधश्रद्धा निर्मूलन समितीने दिलेले लढे व नरेंद्र दाभोळकर यांचे कार्य अधोरेखित केले, अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रा एन एम करडे यांनी उच्च शिक्षण व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण विषयक विचार व विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त माहिती दिली.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ.आरती पांडे व डॉ.ज्योती केदारे यांनी केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संघरत्न गवई यांनी केले तर आभार डॉ. सतीश वाघमारे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास डॉ. गौतम घाडगे, डॉ. प्रज्ञा रूईकर साळवे यांनी परिश्रम घेतले , कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दौलताबाद येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश प्रवक्ते डॉ. भिमराव हत्तीहंबीरे यांचा सत्कार




**दौलताबाद (जावेद अहेमद) :** दौलताबाद येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश प्रवक्ते डॉ. भिमराव हत्तीहंबीरे यांचा सत्कारराष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यक विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष सैय्यद लायकोद्दीन यांच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश प्रवक्ते डॉ. भिमराव हत्तीहंबीरे यांचा दौलताबाद येथे सत्कार करण्यात आला.सत्कार कार्यक्रमात डॉ. हत्तीहंबीरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची विचारधारा कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले तसेच पुढील राजकीय वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्यक जिल्हाध्यक्ष रज्जाक पठाण, युवक राष्ट्रवादी प्रदेश महासचिव अन्वर नवाब, प्रदेश सरचिटणीस विष्णू जगताप, पश्चिम तालुका अध्यक्ष रवींद्र दिवेकर, जनहित संघटना संस्थापक अध्यक्ष मोहम्मद जाकीर, ग्रामपंचायत सदस्य सैय्यद शेरु, भ्रष्टाचार विरोधी समितीचे शहर कार्याध्यक्ष शेख लाला, कल्याण पाटील कांजुणे, दौलताबाद शहराध्यक्ष सैय्यद युनुस, कारभारी गायकवाड, शेख शकील, सैय्यद शफीक, शेख तौफिक, प्रकाश रुपेकर, दिलीप साठे, रवि सोळस, रामदास शेजवळ आदी मान्यवर उपस्थित होते.

## निधन वार्ता



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** इर्शाद सांडू शेख राहणार अब्दीमंडी वय २७ वर्ष यांचे अल्पशा आजाराने दि २४ रविवारी दुपारी निधन झाले आहेत्यांचे दफनविधी अब्दीमंडी येथील कबरस्थान येथे करण्यात आलेत्याच्या पश्चात पत्नी एक मुलगा ,एक मुलगी, आई, वडील, दोन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ ऑगस्ट २०२५

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ : स्थापना आणि मराठवाड्यातील महत्त्व

**प्रस्तावना**

शिक्षण हे मानवी जीवनातील प्रगतीचे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. एखाद्या समाजाची उन्नती ही तेथील लोकांना मिळालेल्या शिक्षणावर अवलंबून असते. मराठवाडा हा प्रदेश निजामशाहीच्या अधिपत्याखाली बराच काळ राहिल्यामुळे शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला होता. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुणे, मुंबई, हैदराबाद किंवा इतर शहरांकडे जावे लागत असे. या परिस्थितीत मराठवाड्यात स्वतंत्र विद्यापीठाची आवश्यकता तीव्रतेने जाणवत होती.या पार्श्वभूमीवर २३ ऑगस्ट १९५८ रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे "मराठवाडा विद्यापीठ" स्थापन झाले आणि तो दिवस मराठवाड्याच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

पुढे १४ जानेवारी १९९४ रोजी या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले. या नावामुळे विद्यापीठाला सामाजिक न्याय, समानता आणि ज्ञानप्रबोधनाचा नवा अर्थ प्राप्त झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने स्थापनेपासून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी दिली असून, मराठवाड्यातील सामाजिक व आर्थिक परिवर्तनात मोठा वाटा उचलला आहे. त्यामुळे हे विद्यापीठ केवळ शैक्षणिक केंद्र न राहता सामाजिक परिवर्तनाचे केंद्र म्हणूनही ओळखले जात आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

संस्कृती, धर्म आणि साहित्याच्या दृष्टीने मराठवाड्याला समृद्ध परंपरा लाभली आहे. मराठवाडा हा प्रदेश जवळजवळ दोनशे वर्षे निजामशाहीच्या ताब्यात राहिला. १९४८ साली "पोलीस ॲक्शन"नंतर हैदराबाद राज्य भारतीय संघात विलीन झाले आणि मराठवाडा भारताचा भाग बनला. पुढे राज्य पुनर्रचनेनंतर १९५६ मध्ये तो बॉम्बे राज्यात समाविष्ट झाला, तर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्यात त्याचा समावेश झाला. शिक्षणाच्या क्षेत्रात मात्र मराठवाडा हा भाग मागे राहिला. निजामकाळात शिक्षण उर्दूमार्फत दिले जात असे. स्वातंत्र्यानंतर मराठीला शिक्षणाचे माध्यम म्हणून मान्यता मिळाली, तरीही उच्च शिक्षणाच्या सुविधा अपुऱ्या होत्या. १९५८ पूर्वी मराठवाड्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या मर्यादित होती; फक्त नऊ महाविद्यालये होती आणि ती सर्व हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठाशी संलग्न होती. पदव्युत्तर अभ्यासक्रम किंवा संशोधनासाठी कुठलीही सोय उपलब्ध नव्हती. त्यामुळे गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण घेणे अशक्यप्राय ठरत होते.या पार्श्वभूमीवर मराठवाड्यात स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेची मागणी जोर धरू लागली. १२ डिसेंबर १९५४ रोजी मराठवाडा शिक्षण समितीने झालेल्या सभेत या मागणीस औपचारिक सुरुवात झाली. १९५५—५६ मध्ये खासदार व आमदारांच्या अधिवेशनांनीही या मागणीला पाठिंबा दिला. १९५६ मध्ये प्रतिनिधीमंडळाने हैदराबाद सरकारकडे यासाठी निवेदन सादर केले. पुढे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी या मागणीची गांभीर्याने दखल घेतली. १९५७ मध्ये न्यायमूर्ती एस. एम. पलुटकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सविस्तर अहवाल देऊन मराठवाड्यासाठी स्वतंत्र विद्यापीठाची शिफारस केली.या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून ५ मे १९५८ रोजी "मराठवाडा विद्यापीठ अधिनियम" पारित झाला. एस. आर. डोंगरकेरी यांची पहिले कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली. अखेर २३ ऑगस्ट १९५८ रोजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे विद्यापीठाचे उद्घाटन झाले. या समारंभाला राज्यपाल आणि शिक्षणमंत्री हितेंद्र देसाई आदी मान्यवर उपस्थित होते.सुरुवातीला छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नांदेड, परभणी व जालना येथील नऊ महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न झाली. यामध्ये शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय (१९२३), मिलिंद महाविद्यालय (१९५०), पीपल्स कॉलेज नांदेड (१९५०), शिक्षक शिक्षण महाविद्यालय (१९५४), कृषी महाविद्यालय परभणी (१९५६), माणिकचंद पाहाडे कायदा महाविद्यालय (१९५६), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (१९५६), योगेश्वरी विज्ञान महाविद्यालय अंबाजोगाई (१९५६) आणि जालना येथील आर्ट्स व कॉमर्स महाविद्यालय (१९५८) यांचा समावेश होता.अशा प्रकारे दीर्घकालीन संघर्ष, जनतेची जिद्द आणि शासनाची साथ यांच्या एकत्रित परिणामातून २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. पुढे १४ जानेवारी १९९४ मध्ये या विद्यापीठाला "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ" हे नाव दिले गेले आणि ते मराठवाड्याच्या शैक्षणिक व सामाजिक इतिहासातील एक अभिमानाचे पान ठरले.

**विद्यापीठाची प्रगती :** १९५८ साली स्थापनेच्या वेळी मराठवाडा विद्यापीठाशी अवघ्या नऊ महाविद्यालये संलग्न होती. प्रारंभी शिक्षणाच्या काही निवडक शाखाच उपलब्ध होत्या. परंतु कालांतराने विद्यापीठाने सातत्याने शैक्षणिक, संशोधनात्मक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली.आज या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात मराठवाड्यातील सर्व आठ जिल्ह्यांतील शेकडो महाविद्यालये कार्यरत आहेत. विज्ञान, कला, वाणिज्य, कायदा, वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, समाजशास्त्र, साहित्य, इतिहास, कृषी अशा विविध शाखांमध्ये उच्च शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**प्रमुख टप्पे :1. संलग्न महाविद्यालयांची वाढ** — सुरुवातीची नऊ महाविद्यालये आज जवळपास चारशेहून अधिक झाली आहेत.

2. **पदव्युत्तर व संशोधन सुविधा** — स्थापनेच्या वेळी नसलेली संशोधन व पदव्युत्तर शिक्षणाची दारे हळूहळू उघडली गेली. आज विद्यापीठात अनेक संशोधन केंद्रे कार्यरत आहेत.

3. **ग्रंथालयाचा विकास** — विद्यापीठाचे ग्रंथालय हे आशियातील महत्त्वाचे वाचनालय मानले जाते. येथे लाखो पुस्तके, प्राचीन हस्तलिखिते व दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध आहेत.

4. **नवीन शैक्षणिक विभाग** — तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, जैवविज्ञान, व्यवस्थापन, मानवशास्त्र इत्यादी क्षेत्रात नवीन विभाग स्थापन झाले.

5. **ग्रामीण व महिला शिक्षणाला चालना** — ग्रामीण व सर्वसामान्य पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देण्यावर विद्यापीठाचा भर राहिला. महिला विद्यार्थिनींचा सहभागही मोठ्या प्रमाणात वाढला.

6. **समाजाशी निगडीत उपक्रम** — लोकजागृती, प्रबोधन व सामाजिक परिवर्तनासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले.विद्यापीठाच्या प्रगतीमुळे मराठवाड्यातील हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली झाली. रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या. संशोधन आणि नवनवीन ज्ञाननिर्मितीमुळे या प्रदेशाचा सामाजिक आणि आर्थिक विकास साध्य झाला.

**विद्यापीठाचे मराठवाड्यातील महत्त्व :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे केवळ शैक्षणिक संस्था नसून, मराठवाड्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक जीवनावर दूरगामी परिणाम करणारे केंद्र आहे. स्थापनेपासून आजपर्यंत या विद्यापीठाने मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका बजावली आहे.

**शैक्षणिक महत्त्व :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेमुळे मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळाली. विद्यापीठ स्थापनेपूर्वी या प्रदेशात उच्च शिक्षणाच्या संधी मर्यादित होत्या. विद्यार्थी आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी पुणे, मुंबई किंवा हैदराबाद येथे जावे लागत असे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण अपूर्ण ठेवावे लागे. मात्र विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर स्थानिक पातळीवरच उच्च शिक्षणाची दारे उघडली आणि हजारो विद्यार्थ्यांना आपल्या गावाजवळ राहूनच पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणे शक्य झाले.विद्यापीठाच्या स्थापनेनंतर मराठवाड्यात महाविद्यालयांची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ झाली. सुरुवातीला मोजकीच महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न होती, परंतु आज जवळजवळ प्रत्येक तालुक्यात महाविद्यालय उभे आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील तरुणाई शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी झाली. उच्च शिक्षणाची ही सोय मराठवाड्यासाठी परिवर्तनकारी ठरली.या विद्यापीठाने संशोधनाला विशेष चालना दिली. विज्ञान, समाजशास्त्र, इतिहास, साहित्य अशा विविध शाखांमध्ये संशोधन प्रकल्प सुरू झाले. संशोधनातून नवनवीन ज्ञाननिर्मिती झाली आणि मराठवाड्याचा ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक वारसा अधोरेखित झाला. हे संशोधन फक्त शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित न राहता समाजाच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरले.महिला शिक्षणालादेखील विद्यापीठाने मोठी चालना दिली. पूर्वी मुलींना उच्च शिक्षणाच्या संधी कमी प्रमाणात मिळत असत, परंतु विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर मुलींनी विविध शाखांमध्ये शिक्षण घेऊन डॉक्टर, अभियंता, वकील, प्राध्यापिका, शास्त्रज्ञ अशी अनेक क्षेत्रे गाठली. यामुळे स्त्रीशिक्षणाबाबत समाजात जागरूकता निर्माण झाली.शिक्षण सर्व समाजघटकांपर्यंत पोहोचवणे हा बाबासाहेबांचा विचार या विद्यापीठाच्या माध्यमातून प्रत्यक्षात आला. वंचित, मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. उच्च शिक्षणामुळे त्यांच्यात सामाजिक आत्मविश्वास निर्माण झाला.आज या विद्यापीठात कला, वाणिज्य आणि विज्ञान यांसोबत तांत्रिक, व्यावसायिक आणि कौशल्याधारित अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे आणि काळाच्या गरजेनुसार शिक्षण घेऊन प्रगती साधू शकतात.एकूणच पाहता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेमुळे मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आला. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढला, संशोधनाला नवी दिशा मिळाली आणि समाजातील प्रत्येक घटकासाठी ज्ञानाची दारे खुली झाली.

**सामाजिक महत्त्व :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेमुळे मराठवाड्यात मोठा सामाजिक बदल घडून आला. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, ही बाब बाबासाहेबांनी मांडली होती. त्यांच्या विचारांचा प्रत्यय या विद्यापीठाच्या कार्यातून आला.विद्यापीठ स्थापन होण्यापूर्वी मराठवाड्यातील समाजव्यवस्था प्रामुख्याने पारंपरिक, सामंती आणि विषमतेवर आधारित होती. उच्च शिक्षणाची संधी केवळ काही विशेष गटापुरती मर्यादित होती. त्यामुळे मागासवर्गीय, दलित, अल्पसंख्यांक आणि ग्रामीण भागातील लोकांना समाजात उन्नती साधणे अवघड होते. परंतु विद्यापीठ उभारल्यानंतर शिक्षणाची दारे सर्व समाजघटकांसाठी खुली झाली. या समावेशक शिक्षणामुळे सामाजिक समता प्रस्थापित होण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली.या विद्यापीठाच्या नावाशी बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जोडले गेले असल्याने वंचित समाजाला मोठा मानसिक आधार मिळाला. शिक्षणाच्या माध्यमातून दलित, शेतकरी, कामगार, महिला आणि मागासवर्गीय समाज घटकांनी आपल्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवला. यामुळे सामाजिक आत्मविश्वास वाढला आणि समाजात स्वाभिमान निर्माण झाला.महिला शिक्षणाचा विस्तार हा या विद्यापीठाच्या सामाजिक योगदानातील महत्वाचा भाग आहे. मुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळाल्यामुळे त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले. यामुळे मराठवाड्यातील कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक विचारसरणीत सकारात्मक बदल झाला.विद्यापीठाने समाजाभिमुख उपक्रमही हाती घेतले. साक्षरता मोहिमा, लोकजागृती कार्यक्रम, शिबिरे आणि सामाजिक समस्यांवर संशोधन अशा उपक्रमांतून समाजातील प्रश्नांना थेट स्पर्श करण्यात आला. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातूनही मराठवाडा अधिक जागरूक झाला.अशिक्षण, अंधश्रद्धा आणि जातीय भेदभाव या समस्यांवर मात करण्यासाठी शिक्षणाची भूमिका महत्त्वाची ठरली. विद्यापीठाने दिलेल्या शिक्षणामुळे लोक विज्ञाननिष्ठ विचारांकडे वळले. समाजात जागरूकता, एकोपा आणि सहिष्णुता निर्माण झाली.

**आर्थिक महत्त्व :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेने मराठवाड्यातील आर्थिक विकासातही महत्त्वाची भूमिका बजावली. शिक्षण हे केवळ व्यक्तीच्या बौद्धिक प्रगतीपुरते मर्यादित नसून ते आर्थिक प्रगतीचेही साधन आहे. या विद्यापीठाच्या स्थापनेमुळे स्थानिक लोकसंख्येला उच्च शिक्षणाच्या संधी मिळाल्या आणि परिणामी रोजगार व उद्योजकतेच्या नव्या दालने उघडली.प्रथम, विद्यापीठामुळे मोठ्या प्रमाणात स्थानिक रोजगारनिर्मिती झाली. विद्यापीठातील अध्यापक, कर्मचारी, संशोधक, प्रशासकीय अधिकारी यामुळे थेट रोजगार उपलब्ध झाला. तसेच ग्रंथालये, वसतिगृहे, संशोधन केंद्रे, कँटीन, छपाई विभाग यांसारख्या सुविधा उभारल्यामुळे अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधीही निर्माण झाल्या. या प्रक्रियेत हजारो लोकांचा सहभाग राहिला.दुसरे म्हणजे, विद्यापीठामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना पुणे, मुंबईसारख्या दूरच्या ठिकाणी शिक्षणासाठी जावे लागेना. त्यामुळे शिक्षणाचा खर्च कमी झाला आणि स्थानिक पातळीवर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने वाढली. शिक्षणाच्या वाढत्या संधींमुळे मराठवाड्यातील तरुण वर्ग कुशल बनला, ज्यामुळे नोकरी व व्यवसाय या दोन्ही क्षेत्रांत प्रगती झाली.तिसरे म्हणजे, विद्यापीठाच्या स्थापनेमुळे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) हे शहर शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित झाले. विद्यार्थी व प्राध्यापकांच्या आगमनामुळे शहरातील निवास, वाहतूक, भोजनालये, किरकोळ दुकाने, पुस्तकांची दुकाने अशा अनेक व्यावसायिक क्षेत्रांना चालना मिळाली. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) आणि परिसराची अर्थव्यवस्था बळकट झाली.याशिवाय, विद्यापीठाने औद्योगिक क्षेत्राशी निगडीत अभ्यासक्रम, तांत्रिक शिक्षण आणि संशोधनाला प्रोत्साहन दिले. या ज्ञानामुळे स्थानिक पातळीवर लघुउद्योग, सेवा उद्योग, तंत्रज्ञान-आधारित उद्योग सुरू झाले. यामुळे तरुणांमध्ये उद्योजकतेची भावना वाढीस लागली आणि रोजगारनिर्मितीची व्याप्ती वाढली.ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झालेल्या शिक्षणामुळे शेतीतही बदल दिसून आला. कृषीविज्ञान, अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन या विषयांतून ग्रामीण भागातील युवकांनी आधुनिक शेतीपद्धती, बाजारपेठेचा अभ्यास व आर्थिक व्यवस्थापन या कौशल्यांचा अवलंब केला. त्यामुळे शेती व ग्रामीण अर्थव्यवस्था हळूहळू सुधारू लागली.एकूणच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे मराठवाड्यातील आर्थिक जीवनमान उंचावण्यात एक प्रभावी घटक ठरले. शिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि औद्योगिक प्रगती या सर्व स्तरांवर या विद्यापीठाने महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**सांस्कृतिक महत्त्व :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे केवळ शिक्षणाचे केंद्र राहिले नाही, तर मराठवाड्यातील सांस्कृतिक जीवनाच्या विकासासाठीही ते एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरले. विद्यापीठामुळे समाजात बौद्धिक चळवळीना गती मिळाली आणि सांस्कृतिक जागरूकतेला एक नवे दिशा लाभली.प्रथम, विद्यापीठामुळे मराठवाड्यात साहित्य, कला, संगीत, नाटक, चित्रपट व विविध सांस्कृतिक अभिव्यक्ती यांना प्रोत्साहन मिळाले. विविध महाविद्यालयांमधून निर्माण झालेल्या साहित्यिक व कलावंतांनी मराठवाड्याचे सांस्कृतिक वैभव राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर पोहोचवले. विद्यार्थ्यांनी आयोजित केलेले सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यस्पर्धा, काव्यवाचन, वादविवाद, लोककला व शैक्षणिक चर्चासत्रे यामुळे परिसरातील सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध झाले.दुसरे म्हणजे, विद्यापीठाने संशोधन व अभ्यासाद्वारे मराठवाड्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे जतन केले.छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), दौलताबाद, अजंठा, वेरूळ यांसारखी जागतिक वारसा स्थळे, येथील स्थापत्यकला, चित्रकला आणि धार्मिक परंपरा या सर्वांचा शास्त्रीय अभ्यास करून त्यांना जगासमोर सादर करण्यात आले. त्यामुळे मराठवाड्याच्या सांस्कृतिक ओळखीला एक भक्कम अधिष्ठान मिळाले.तिसरे म्हणजे, विद्यापीठामुळे मराठवाड्यातील बहुसांस्कृतिक वातावरण अधिक सशक्त झाले. येथे विविध धर्म, जाती, भाषा व परंपरांचे विद्यार्थी एकत्र आल्यामुळे परस्पर संवाद वाढला. या संवादातून सामाजिक समज, बंधुता व सामायिक सांस्कृतिक मूल्यांचा विकास झाला.विद्यापीठाने लोककला, लोकसाहित्य आणि ग्रामीण परंपरांना जतन व प्रोत्साहन देण्याचे कार्यही केले. मराठी साहित्य परिषद, सांस्कृतिक मंच, महाविद्यालयीन उत्सव यामधून लोकपरंपरा आणि आधुनिकता यांचा संगम साधला गेला.याशिवाय, विद्यापीठामुळे मराठवाड्यातील सांस्कृतिक क्षेत्राला आंतरराष्ट्रीय दारेही उघडली. परदेशी विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे, तसेच विविध परिषदांमुळे सांस्कृतिक देवाणघेवाण सुलभ झाली.एकंदरीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे मराठवाड्यातील सांस्कृतिक विकासाचे प्रमुख केंद्र आहे. यामुळे समाजात साहित्यिक व कलात्मक अभिव्यक्ती फुलली, ऐतिहासिक वारसा जपला गेला, आणि विविधतेतून एकात्मतेचा संस्कार अधिक दृढ झाला.

**निष्कर्ष :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची स्थापना ही मराठवाड्याच्या इतिहासातील एक क्रांतिकारी घटना होती. शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजघटकांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, प्रगतिशील विचारांचा प्रसार करणे आणि समाजात नवे परिवर्तन घडवून आणणे हे या विद्यापीठाचे प्रमुख योगदान आहे.या विद्यापीठामुळे मराठवाड्यात शैक्षणिक स्तर उंचावला, सामाजिक जागृती निर्माण झाली, आर्थिक विकासाला गती मिळाली आणि सांस्कृतिक वैभवाला नवे अधिष्ठान प्राप्त झाले. आज या विद्यापीठातून घडलेले विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत असून ते केवळ मराठवाड्याचेच नव्हे तर देशाचे आणि जगाचेही नाव उज्ज्वल करीत आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव धारण करणारे हे विद्यापीठ हे त्यांच्या विचारांचे, संघर्षाचे आणि समाजोद्धार कार्याचे प्रतीक आहे. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासात याची भूमिका अनन्यसाधारण असून भविष्यातही हे विद्यापीठ ज्ञान, विज्ञान, मानवता आणि प्रगती यांचे दीपस्तंभ म्हणून कार्यरत राहील यात शंका नाही.



**डॉ. शेख इस्माईल महेबुब**
(एम.ए. इतिहास, सेट, नेट,पीएच.डी.)